विज्ञानाच्या प्रगतीवर देशाची प्रगती अवलंबून असते

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १३ जुले २०२५ | अंक २०५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# विश्वासच उडाला: छांगूर बाबाचं महाधक्कादायक कांड, थेट नोकराच्याच बायकोला फसवलं

उत्तर प्रदेशातील बलरामपूर जिल्ह्यात धर्मांतर रॅकेट चालवणाऱ्या छांगूर बाबाच्या चौकशीत दररोज नवीन खुलासे होत आहेत. ज्यामुळे अनेक धक्कादायक प्रकरणं समोर येत आहेत. आता छांगूर बाबावर त्याच्या घरातील नोकर संचित याने देखील गंभीर आरोप केले आहे. संचित याने केलेल्या आरोपांनुसार, छांगूर बाबाने लाखो रुपयांचं आमिष देत संचित याला देखील धर्मांतर करण्यास सांगितलं आणि धमक्या दिल्या होत्या. संचित यांनी धर्मांतर करण्यास स्पष्ट नकार दिल्यानंतर त्याच्या पत्नी खोट्या प्रकरणात अडकवून तुरुंगात टाकलं. संचित याने अनेकदा पोलिसांत तक्रार केली. पण त्याचा काहीही फायदा झाला नाही. भारत-नेपाळ सीमेपासून अवघ्या 30 किलोमीटर अंतरावर असलेल्या उत्तरौला शहरात वर्षानुवर्षे धर्मांतराचे नेटवर्क चालवणारा छांगूर बाबा यांच्यावर आता त्याच्या घरातील नोकर संचित यांनी धर्म बदलण्यासाठी दबाव आणल्याचा आरोप केला आहे. संचितने बाबाच्या हवेलीत सहा महिने काम केलं. सचिंत याने सांगितल्यानुसार, 'इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी बाबाने 5 लाख रुपयांची रोख रक्कम, एक घर आणि दुचाकी देण्याचं वचन दिलं होतं. सनातन धर्माचा त्याग करून इस्लाम स्वीकारावा अशी बाबाची इच्छा होती...' पण जेव्हा संचित याने नकार




दिल्यानंतर त्याला धमकावण्यास सुरुवात झाली. बाबांच्या धर्मांतर रॅकेटमुळे त्रस्त झालेल्या संचितने कंत्राटदार वासिद्दीन उर्फ बब्बूकडेही याबद्दल तक्रार केली होती. पीडित संचितने सांगितल्यानुसार, त्याने बलरामपूर पोलिस स्टेशन, क्षेत्र अधिकारी आणि एसपी यांच्याकडे बाबाबद्दल तक्रार केली, परंतु कोणतीही कारवाई झाली

### नोकराच्या बायकोला फसवलं...

जेव्हा संचितने धर्मांतर करण्यास नकार दिला आणि नोकरी सोडली, तेव्हा बाबाने त्याचं जीवन आणखी कठीण केलं. संचितच्या म्हणण्यानुसार, बाबाच्या सांगण्यावरून, त्याच्या गावातील गुंडांनी संचित आणि पत्नीला खोट्या प्रकरणात अडकवून तुरुंगात पाठवले.

नाही. बाबाच्या प्रभावामुळे आणि पैशांमुळे कोणीही त्याच्या तक्रारी गांभीर्याने घेतल्या नाहीत असा देखील आरोप आहे.

त्याची पत्नी जवळपास 24 दिवस तुरुंगात होती. संचित आज देखील न्यायासाठी लढत आहे. पण त्याला अद्याप कोणताच दिलासा मिळालेला नाही. अशा परिस्थितीत, असं मानलं जातं आहे की जर छांगूर बाबासारखा माणूस स्वतःच्या नोकरला धर्म बदलण्यास भाग पाडू शकतो, तर सामान्य लोकांचे काय झालं असेल... याची कल्पना करणं देखील कठीण नाही.

# मांजरा प्रकल्पात अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध करावे बुट्टेनाथ तलावासाठी पाणी उपलब्धता दाखला द्या

## आ.नमिता मुंदडा यांनी सभागृहात केल्या आग्रही मागण्या

अंबाजोगाई । केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सौ. नमिता मुंदडा यांनी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात मांजरा धरण प्रकल्पासाठी अतिरिक्त पाणीसाठा उपलब्ध करून देण्याची जोरदार मागणी केली. त्यांनी सभागृहात मुद्देसूद भाषण करत या प्रकल्पाच्या सध्याच्या मर्यादा आणि ग्रामीण भागातील पाण्याच्या तुटवड्यावर लक्ष वेधले. मांजरा



प्रकल्पातून सध्या ६०.७५ दलघमी पाणी पिण्याच्या व औद्योगिक गरजांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. हे पाणी लातूर, अंबाजोगाई, केज, कळंब आणि आसपासच्या गावांसाठी वापरले जाते. मात्र, या धरणात १०० दलघमी क्षमतेचा तुटवडा भासत आहे. सिंचनाच्या उद्दिष्टपैकी केवळ ३,००० ते ३,५०० हेक्टर क्षेत्रालाच कालव्यांद्वारे पाणी मिळते, जे की एकूण ११,८८८ हेक्टर क्षेत्राच्या तुलनेत अत्यल्प आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी १४ ऑक्टोबर २०२१ च्या शासन निर्णयाचा संदर्भ देत सांगितले की, गोदावरी खोऱ्यातून १९.२९ ढचउ पाणी दुसऱ्या प्रकल्पात वळवण्यास मान्यता दिली गेली आहे. यामधून मांजरा प्रकल्पासाठी २ ते ३ ढचउ पाणी वळवणे अत्यंत आवश्यक आहे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली

# स्थानिक स्वराज्य निवडणुका संदर्भातआम आदमी पार्टीच्या मराठवाडा पदाधिकाऱ्यांची बैठक बीडमध्ये

बीड ( प्रतिनिधि):- बीड महाराष्ट्र मध्ये होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी उद्या दिनांक १३/ ७ / २०२५ रोजी मराठवाड्यातील पदाधिकारी मराठवाडा तील सर्व जिल्ह्याचे जिल्हा अध्यक्ष जिल्ह्यातील पदाधिकारी यांची बैठक शासकीय विश्राम गृह बीड येथे सकाळी ११ वाजता ठेवण्यात आलेलीतरी मराठवाडा विभागातील सर्व पदाधिकारी जिल्हा अध्यक्ष



यांनी या बैठकीला उपस्थित राहणे अनिवार्य आहे कारण महाराष्ट्रामध्ये पुढील येणाऱ्या स्थानिक स्वराज्य निवडणुका विषयी मराठवाड्याचे सचिव मा.संग्रामजी गाडगे पाटील व मराठवाड्याचे सचिव मा. वैद्यनाथ जी राठोड हे या बैठकीला संबोधित करणार आहेत त्याचबरोबर पत्रकार परिषद घेऊन पुढील दिशा ठरविणार आहेत तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावे

# जि. प. प्रा. शाळा वैजाळा विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश.

पाटोदा. जि. प. प्रा. शाळा वैजाळा मराठी शाळा ही गुणवत्तेत ठरली पाटोदा तालुक्यात अव्वल. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये घेण्यात आलेल्या पाचवी मधील विद्यार्थ्यांनी *९ पैकी पात्र ४ शिष्यवृत्तीधारक २ सिद्धी गोकुळ ढास आणि यशश्री संजय येडे मुलींनी उल्लेखनीय कामगिरी करत यश संपादन करत गावाचे नाव उज्वल केले आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे पाटोदा



तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. बोदार्डे साहेब, शिक्षण विस्ताराधिकारी श्री प्रशांत शिंदे साहेब, दासखेड केंद्राचे केंद्र प्रमुख घुमरे साहेब, केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री बांगर साहेब, तसेच केंद्रातील सर्व आदरणीय शिक्षक वर्ग, ग्राम स्थ वैजाळा ,व शाळेचे मुख्याध्यापक हजारे सर यांनी अभिनंदन करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

# दांडी बहाद्दर अधिकाऱ्यांमुळे शेतकऱ्यांना त्रास

## मंडळ अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी

माजलगाव तालुक्यातील महसूल विभागातील मंडळ अधिकारी व तलाठी नियुक्त गावात हजर राहत नसल्याने शेतकर्यांची मोठी कोंडी होत आहे. शेतकर्यांना आपली कामे सोडू न तलाठी कार्यालया समोर त्यांच्या येण्याची वाट पाहत दिवस काढावा लागत आहे.तरी ही ते न येता दांडी मारत असल्याने या दांडी बहाद्दर कर्मचार्यामुळे शेतकर्यांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. याकडे तहसीलदार,व जिल्हाधिकारी यासह वरिष्ठ लक्ष देणार का? असा संतप्त सवाल माजलगाव तालुक्यातील शेतकर्यांमधून विचारला जात आहे. सध्या बहुतांश कर्मचारी नियुक्त ठिकाणी न येता बसूनच आपले कामकाज करत आहेत. यामध्ये महसूल खात्याचे कर्मचारी वर्गाचा सर्वात वरती नंबर आहे.गावात शासनाकडून तलाठी व सर्कल यांना नियुक्त गावे देण्यात आली आहेत. त्यांना त्यांची बसण्याची ठिकाणेही दिलेली आहेत. परंतु या सर्व गावात एकाही ठिकाणी शासनाने नेमून दिलेल्या वेळेत दररोज तलाठी किंवा सर्कल हजर नसतात. तलाठी सर्कल यांना शासनाने नियुक्त गावात आपली वेळ ठरवून दिली आहे.त्याप्रमाणे संबंधितांचे वेळापत्रक त्यांच्या नियुक्ती ठिकाणी असणे गरजेचे आहे. परंतु गावात त्यांची कामाची वेळ व कामाचे दर्शनी भागात वेळापत्रक असणे गरजेचे आहे.परंतु असे कोणतीही वेळापत्रक कोणत्याही तलाठी अथवा सर्क ल कार्यालयात पहावयास मिळत नाही. त्यामुळे आपल्या कामकाजाला शेतीकामातून वेळ काढू न शेतकरी जर महसूल कार्यालयात गेला तर त्या ठिकाणी तलाठी किंवा सर्कल भेटत नाहीत. परिणामी शेतकर्यांना तलाठी यांच्या आगमनाची वाट पाहत बसावे लागते. तरीही तलाठी येत नसल्याने हाताखालचा कर्मचारी ताठरपणाने वागत शेतकर्यांची आडवणूक करून पिळवणूक करत असतो.आर्थिक त्यामुळे शेतकर्याला आपले काम करून घेण्यासाठी दुसरा पर्याय नसल्याने मागेल तेवढी रक्कम द्यावी लागते.शेतकर्यांना जागेवर व वेळेत सेवा देण्यासाठी ही कार्यालय आहेत. परंतु तालुक्यात मात्र वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी यांचा वचक प्रशासनावर नसल्याने उलटा कारभार सुरू आहे. शासन शेतकर्यांच्या दारी असे शासनाचे ब्रीद आहे. परंतु तालुक्यात मात्र शेतकर्यांनी शासन दारी यावे अशी उलटी गंगा वाहत येण्याचा प्रकार सुरू आहे. महसूल प्रशासनातील अधिकार्यांनी एखादा दुसरा दिवस तालुका जिल्हास्तरावर कामकाजात घालवला तर गैर नाही



बीड : जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. उल्हास गंडाळ यांच्या अध्यक्षतेखाली खाली जागतिक लोकसंख्या दिन जिल्हा प्रशिक्षण संघ बीड येथे साजरा करण्यात आला, त्यावेळी जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सचिन शेकडे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विकास आठवले, डॉ. कासट तालुका आरोग्य अधिकारी पाटोदा,डॉ. विशाल मुळे जिल्हा प्रशिक्षण संघ वैद्यकीय अधिकारी, डॉ स्वप्निल मुंडे सर जिल्हा प्रशिक्षण संघ वैद्यकीय अधिकारी सर त्याचबरोबर साथ रोग अधिकारी डॉ. पिंगळे व जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी माजीद शेख, सांख्यिकी अधिकारी श्री सोनवणे साहेब व इतर अधिकारी कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते.

# कार्यकर्त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही – अमरसिंह पंडित

## आनंदवाडीचे सतिष चव्हाण यांच्यासह शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादीत दाखल

गेवराई । प्रतिनिधी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीबद्दलचा विश्वास जनसामान्यात वाढत आहे. राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून सर्व समावेशक विकास कामे होत आहेत. याच जोरावर ग्रामीण भागातील शेकडो कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत. नवीन प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या माध्यमातून आमच्यावर विश्वास व्यक्त केला आहे, कार्यकर्त्यांच्या या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही असे प्रतिपादन माजी आमदार अमरसिंह पंडित यांनी केले. त्यांच्या उपस्थितीत मौजे आनंदवाडी येथील सतीश चव्हाण यांनी त्यांच्या असंख्य कार्यकर्त्यांसह माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला, यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. गेवराई विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर इनकमिंग सुरु आहे. जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित आणि आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन मोठ्या प्रमाणावर कार्यकर्ते पक्षप्रवेश करत आहेत. शुक्रवार, दि.११ जुलै रोजी तलवाडा जिल्हा परिषद गटातील मौजे आनंदवाडी येथील भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते सतीश चव्हाण यांनी त्यांचे सहकारी ज्ञानेश्वर चव्हाण, रामेश्वर चव्हाण, अनिल चव्हाण, बालाजी गायकवाड, जयराम गायकवाड, सखाराम चव्हाण, भागवत चव्हाण, पृथ्वीराज चव्हाण,




जयराम नरवडे, राहुल चव्हाण, दादा गायकवाड, लक्ष्मण चव्हाण, प्रदीप तांगडे, गहीनाथ तांगडे, रामेश्वर तांगडे, तुकाराम चव्हाण, भास्कर चव्हाण, अविनाश गायकवाड, गणेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, गणेश चव्हाण, अरविंद पवार, बळीराम चव्हाण, संतोष हातागळे, किशोर हातागळे, भैय्या हातागळे, अनिल हातागळे, रमेश हातागळे, विजय हातागळे, भीमा हातागळे, भरून हातागळे, जितेंद्र हातागळे, विजय हातागळे आदी शेकडो समर्थकांसह राष्ट्रवादी काँग्र ेसचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या उपस्थितीमध्ये आनंदवाडी येथे राष्ट्रवादी काँग्र ेस पार्टीमध्ये जाहीर प्रवे ेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये स्वागत केले. यावेळी माजी नगराध्यक्ष महेश दाभाडे, माजी सभापती आसाराम मराठे, राष्ट्रवादी काँग्र ेसचे शहराध्यक्ष दीपक आतकरे, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, राष्ट्रवादी युवकचे विधानसभा क्षेत्र अध्यक्ष गजानन काळे, माजी सरपंच विष्णू हत्ते, मनोज हजारे, सरपंच रामप्रसाद चाळक, विठ्ठल चव्हाण, रणजीत घु ंबार्डे, सरपंच राधेश्याम चक्कर, बंटी सौंदरमल, लहू लोखंडे, विजय सुतार, नजीम कुरेशी, प्रकाश चव्हाण यांच्यासह राष्ट्रवादीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
रविवार १३ जुले २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

## विद्यार्थ्यांसाठी शेतीविषयक अभ्यास दौरे असावेत

देशातील शेतीविषयक अभ्यास करताना विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतीकामाचा अनुभव घेणे फार महत्त्वाचे असते. आजही आपल्या देशात शेती हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने मानवी जीवनात शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. तेव्हा पुस्तकात शेतीच्या धड्यांचा अभ्यास करीत असताना शेतात जाऊन काम केल्याने विद्यार्थ्यांना शेतीविषयक अधिक माहिती मिळते. यामध्ये नांगरणी, तरवा पेरणे, तरवा काढणे, रोव पेरणे, लावणी लावणे, कापणी करणे व झोडणे इत्यादी कामे करावी लागतात. तेव्हा सध्या पावसाळा सुरू आहे. शेतीची कामेसुद्धा सुरू असून कोकणात भात लावणी चालू आहे. तशी वेगवेगळ्या प्रकारची शेतीसुद्धा केली जाते. अशावेळी विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्ष शेतीकामाचा अनुभव घेण्यासाठी अभ्यास दौरे शैक्षणिक संस्थांनी आयोजित करावेत. जेणेकरून त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडून शेतीक्षेत्राची अधिक गोडी निर्माण होण्याला मदत होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. शाळेबरोबर शेतातसुद्धा शेती हंगामात शाळा भरवली पाहिजे. भारत हा शेतीप्रधान देश आहे. जरी पुस्तकातून शेतीचे धडे शिकविले गेले तरी प्रत्यक्षात शेती कशी केली जाते हे जवळून पाहता यावे तसेच प्रत्यक्ष शेतात काम करून एक नवीन अनुभव विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी विद्यार्थ्यांचे शेतीविषयक अभ्यास दौरे आयोजित करण्यात यावेत. म्हणजे प्रत्यक्ष काम केल्याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळून त्यांना त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडू शकते. तेव्हा सध्या पावसाळी शेतीची कामे सुरू आहेत. पाऊससुद्धा बऱ्यापैकी शेती योग्य लागत आहे. यात चिखलात नांगरणी, पेरणी, लावणी यांचा प्रत्यक्षात अनुभव मिळू शकतो. महत्त्वाची बाब म्हणजे, शेतात काम केल्याचे विशेष समाधान मिळेल. याचा चांगला परिणाम शेतात प्रत्यक्ष काम केल्याने शेतीविषयक कामाची त्यांच्या ज्ञानात अधिक भर पडणार आहे. शेतीच्या बांधावर जाऊन शेतीची पाहणी करण्यापेक्षा वाफ्यात जाऊन चिखलात लावणी लावल्यामुळे त्याचा अनुभव संदर्भ पुस्तकाच्या पलीकडचा असतो. सध्या भात लावणीची कामे कोकणात जोरात चालू आहेत. तेव्हा विद्यार्थ्यांना शेतीविषयक लागवडीची माहिती घेण्यासाठी शेती हंगामात विद्यार्थ्यांचे अभ्यास दौरे आयोजित करायला हवेत. यातून विद्यार्थ्यांना शेतीची आवड निर्माण होण्याला मदत होईल. ही समाधानाची बाब आहे. आजही शेतकरी ग्रामीण भागात पारंपरिक पद्धतीने शेती करतात. जर विद्यार्थ्यांना अशा अभ्यास दौऱ्यातून शेतीचे ज्ञान मिळाल्यास त्याचा फायदा ते आपल्या घरच्या शेतीत उत्तमप्रकारे बदल करून अधिक उत्पादन घेऊ शकतात. हे फक्त आपल्याला अनुभवातून मिळते. तसेच विद्यार्थ्यांना शेतकरीदादा यांचे शेतीविषयक मौलिक विचार व मार्गदर्शन मिळू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे, सध्या पावसाळी शेती हंगाम सुरू झाल्याने विद्यार्थ्यांना पुस्तकातून शेतीचे धडे शिकविताना आता प्रत्यक्ष अनुभव येण्यासाठी अभ्यास दौरे करावेत. म्हणजे भाताची लावणी कशी करण्यात येते याची विद्यार्थ्यांना कल्पना येते. त्या आधी तरवा कसा काढायचा हे प्रत्यक्षात अनुभवता येते. लावणीसाठी चिखल कसा तयार केला जातो याचे वाफ्यातील चिखलाचे निरीक्षण करून पाहू शकतो. त्यासाठी नांगरणी कशी केली जाते, याची माहिती मिळते. सध्या बऱ्याच ठिकाणी नांगरणी ट्रॅक्टरने केली जात आहे. सध्या क्वचित बैलांचे जोत बांधून नांगरणी केल्याचे पाहायला मिळते. बैलांच्या साहायाने केलेली नांगरणी अधिक गलगलीत होत असते. तशी ट्रॅक्टरने होत नाही. याचा चांगला परिणाम चिखलात लावणी लावताना बोटाला सहसा इजा होत नाही. त्यामुळे अधिक उत्साहाने भाताची लावणी लावली जाते. शेती हंगामातील अभ्यास दौऱ्यामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबर प्रत्यक्षात वाफ्यातील चिखलात लावणी लावल्याचा अनुभव येईल. बऱ्याच वेळा शेतीची कामे पूर्ण झालेली असतात. त्यावेळी शेतीच्या बांधावर जाऊन शेतीचा अभ्यास केला जातो. तेव्हा असे न करता आता पावसाळा ऋतू चालू आहे. यावर्षी पावसाळा ऋतू चालू होण्यापूर्वी वरुणराजाचे जोरात आगमन झाले होते. आतासुद्धा समाधानकारक पाऊस लागत आहे. त्यामुळे कोकणात नांगरणी करून भात पेरण्यात येऊन आता तरवा काढून चिखल करून लावणी लावण्यात येत आहे. अशावेळी शाळेतील मुलांना प्रत्यक्ष लावणी कशी लावली जाते याचा अनुभव येण्यासाठी शेतीला अनुसरून धडे असतील अशा मुलांचे अभ्यास दौरे आता काढावेत. मुलांना चिखलात प्रत्यक्ष भाताची लावणी लावण्याचा अनुभव घेता येईल. हा शेतीमध्ये काम केल्याचा अनुभव त्यांना इतर काम करताना प्रेरणा देणारा ठरणार आहे. हल्ली ग्रामीण भागातील प्राथमिक शाळेतील मुलांना लावणीचा अनुभव येण्यासाठी शिक्षक शेतात नेऊन प्रत्यक्ष लावणी कशी लावली जाते याची माहिती व प्रात्यक्षिक दाखवून नंतर त्यांना लावणी लावायला सांगतात. तशी ग्रामीण भागातील मुले शेती कामात हुशार असतात. आई-वडिलांसोबत शेतात काम करीत असतात. त्यामुळे त्यांना दांडगा अनुभव शेती कामाचा असतो. बरीच कामे ग्रामीण भागातील मुले शाळा सांभाळून करतात. त्यांना अप्रत्यक्षपणे शेतीकामाचा अनुभव असतो. तेव्हा विद्यार्थ्यांना शाळेत शेतीविषयक धड्यांचा अभ्यास करताना प्रत्यक्षात शेतावर जाऊन शेतीविषयक अभ्यास करण्यासाठी अभ्यास दौऱ्यांची गरज आहे. ठिकठिकाणी एमआयडीसी विखुरल्या असल्याने तेथील प्रमुख रेल्वे स्टेशनवरही ताण वाढत चालला आहे. मुंबईत सुरू असलेल्या मेट्रोतील प्रवासी संख्या वाढत असली तरी उपनगरीय रेल्वेच्या तुलनेत हा आकडा केवळ १० टक्केच आहे. दररोज सरासरी आठ लाख प्रवाशांची या चारही मार्गिकांवर ये-जा होते. त्यासाठी मेट्रोच्या जवळपास ९९९ फेऱ्या होत आहेत.

# कोठारबनची हाक सरकार मायबाप, आम्हाला आमची शाळा बांधून द्या!

## बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील कोठारबन शाळेची धोकादायक अवस्था; २०० हून अधिक विद्यार्थ्यांचं शिक्षण धोक्यात

बीड प्रतिनिधी / लोकपत्रकार भांगे वडवणी तालुका, बीड | प्रतिनिधी एकीकडे 'शिक्षण हेच शस्त्र' अशी घोषणा सरकार करत असतानाच, दुसरीकडे बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कोठारबन ही धोकादायक अवस्थेत पोहोचली आहे. तब्बल २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असलेली ही तालुक्यातील सर्वात मोठी शाळा आज अक्षरशः कोसळण्याच्या वाटेवर आहे. पावसाळा सुरू झाल्यापासून पालक, विद्यार्थी आणि शिक्षक सगळेच जीव मुठीत घेऊन शाळेत येत आहेत.




जुनी इमारत, दरवर्षीचा धोका!

ही शाळा गेल्या अनेक वर्षांपासून जीर्णावस्थेत आहे. इमारतीच्या भिंतींना मोठी भगदाडं पडलेली असून, पावसाच्या पाण्यामुळे त्या भिंतींना विद्युत प्रवाह (करंट) येतो, असा गंभीर आरोप शाळकरी मुलांनी केला आहे. "शाळेत बसायलाही भीती वाटते," अशी प्रतिक्रिया दिली आहे आठवीच्या विद्यार्थिनी प्राजक्ता भोसलेने. ती पुढे म्हणते, "माझ्या आईवडिलांना रोज सांगते की मला शाळेत जाऊन वाटतंय पण भीती वाटते."

पालकही चिंतेत – "मुलं शिकवायची, की जीव वाचवायचा?"

गावातील पालक प्रचंड अस्वस्थ आहेत. काही दिवसांपूर्वी जोराच्या वाऱ्यामुळे शाळेवरचं पत्र उडून गेलं, त्यामुळे संपूर्ण वर्ग ओला झाला. "सरकार म्हणतं शिक्षण द्या, पण मुलं कुठं शिकणार? छप्परच उडालंय!" असा सवाल उपस्थित केला आहे गावकरी पालक भगवान राव मुंडे यांनी.

शिक्षकांचा देखील उद्रेक – "शिकवावं की भिंतीकडे बघत राहावं?

शाळेचे शिक्षकही कमालीचे त्रस्त झाले आहेत. "दिवसेंदिवस परिस्थिती बिकट होत चालली आहे, शिकवताना दरवाजाकडे वळून कुठं भिंत पडेल याकडे लक्ष ठेवावं लागतं," असं सांगताना शिक्षकांच्या डोळ्यातील चिंता स्पष्ट जाणवत होती. "थोड्याच दिवसात रस्त्यावर शाळा भरवावी लागेल," असा इशाराच दिला आहे आदर्श शिक्षक मस्करे सर यांनी.विद्यार्थ्यांचा भावनिक सूर – "सरकार मायबाप, आम्हाला आमची शाळा बांधून द्या"

या मुलांच्या डोळ्यांत स्वप्नं आहेत, पण आज त्यांच्या नजरेत भीती आहे. पाचवीचा विद्यार्थी उमेश म्हणतो, "मला मोठं होऊन डॉक्टर व्हायचंय, पण शाळा पडली तर आम्ही कुठं शिकणार?" अनेक विद्यार्थ्यांनी एकमुखाने सरकारकडे विनंती केली – "आम्हाला फक्त शाळा बांधून द्या, शिक्षण घेणं बाकी आम्ही पाहू!" सरकारने ऐकावं – गावकऱ्यांची मागणी स्पष्ट!कोठारबन शाळेची अवस्था केवळ शिक्षणाची नव्हे तर मुलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न झाला आहे. गावकरी, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी – सगळ्यांची एकच मागणी आहे, "नवीन इमारत, सुरक्षित शिक्षण आणि मुलांच्या भविष्यासाठी तत्काळ निर्णय."

लोकपत्रकार भांगे म्हणतात सरकारने फक्त आकड्यांवरून योजना आखू नयेत, तर जमिनीवरची परिस्थिती ओळखावी. शाळा केवळ इमारती नसते, ती हजारो मुलांच्या स्वप्नांची जागा असते. कोठारबनच्या विद्यार्थ्यांच्या डोळ्यांतले स्वप्नं कोसळू नयेत, यासाठी आजच पावलं उचलणं आवश्यक आहे .

# लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत रेंज पाहिजेनाटकाच्या तालमीचा शुभारंभ!

बीड, प्रतिनिधी - अनेक वर्षांच्या प्रदीर्घ कालखंडानंतर बीडच्या रंगभूमी नवचैतन्याचा श्वास घेणार आहे. लक्ष्मीकांत दोडके दिग्दर्शीत आणि सोनल नहार लिखितरेंज पाहिजेफ या दोन अंकी नाटकाची निर्मिती करण्यात येत असून काल दि. ११ जुलै २०२५ रोजी सायंकाळच्या दरम्यान गुरुपौर्णिमेच्या मंगलमय दिनी नटराजाच्या पावन साक्षीने या नाटकाच्या तालमीचा भव्य शुभारंभ पार पडला. जेष्ठ पत्रकार व दै. दिव्य लोकप्रभाचे संपादक सन्मानीय संतोषजी मानूरकर तसेच ट्विंकलिंग स्टार स्कूलचे संस्थाचालक मा. गणेश मैड यांच्या शुभहस्ते या नाट्यप्रयोगाच्या तालमीचा प्रारंभ आणि पोस्टर प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. आम्ही कलावंत प्रस्तुत रेंज पाहिजेफ या नाटकाचे दिग्दर्शन लक्ष्मीकांत दोडके यांच्याकडे असून या नाटकाचे लेखन सौ. सोनलताई नहार यांनी केले आहे. सहाय्यक दिग्दर्शक म्हणून रोहित पुराणिक आपले योगदान देणार आहेत. दरम्यान



उदघाटक संतोष मानूरकर व गणेश मैड यांनी संपूर्ण नाट्यसंघाला मनःपूर्वक शुभेच्छा देत कलाकारांचे मनोबल उंचावले. या नाटकात बीडमधील तब्बल ७० कलाकार सहभागी होतायत हेच या नाटकाचे खरे सामर्थ्य ठरणार असून या नाट्यप्रयोगाच्या माध्यमातून बीडची रंगभूमी पुन्हा नवचैतन्याने फुलणार असल्याची भावना व्यक्त केली. याप्रसंगी रेंज पाहिजे या नाटकातील सहभागी कलाकार तसेच पालक उपस्थित होते. नवोदित कलाकारांना एकत्र आणून त्यांना व्यासपीठ देण्याच्या हेतूने या नाटकाची निर्मिती होत




आहे व कालपासूनच या नाटकाची तालीम सुरु झाली आहे. येत्या ऑगस्ट महिन्यात रेंज पाहिजे या नाटकाचा भव्य रंगमंचीय सादरीकरण प्रयोग रसिक प्रेक्षकांसमोर सादर होणार आहे, अशी माहिती या नाटकाचे निर्मिती सूत्रधार प्रतिक कांबळे यांनी दिली आहे.

# अपहरण झालेल्या सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि गुंडाकडून बेदम मारहाण!

## मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट गंभीर जखमी जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु

बीड दि.१२(प्रतिनिधी)- बाराशे रुपयासाठी ऊसतोड कामगाराचे मुकादमाने अपहरण केल्याची माहिती मिळताच सालगड्याला वाचवण्यासाठी गेलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना ऊसतोड मुकादम आणि त्याच्या साथीदारानीन बेदम मारहाण केल्याची घटना काल शुक्रवार दिनांक ११ रोजी माजलगाव तालुक्यातील लऊळ गावात घडली. या घटनेमध्ये सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी राजाराम सिरसट यांनी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिली असुन याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या घटनेने जिल्ह्यामध्ये एकच खळबळ उडाली. याबाबत अधिक माहिती अशी की माजलगाव तालुक्यातील किट्टीआडगाव येथील रहिवासी असलेले सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांच्याकडे शेतात काम करण्यासाठी असणारा शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे ऊसतोड मुकादम शेख राजू शेख बाबू रा. मंजरथ ता. माजलगाव जि.बीड याचे बाराशे रुपये देणे होते. या बाराशे रुपयांसाठी या मुकादमाने व त्याच्या साथीदारांनी शेतगडी विश्वनाथ पंडित यांचे शुक्रवार दिनांक ११ रोजी सकाळी दहा वाजता अपहरण केले. त्यानंतर त्याला मारहाण करायला सुरुवात केली. त्याने स्वतः चा बचाव करण्यासाठी शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना फोन करून मारहाण होत असल्याची माहिती दिली. सदर प्रकरणाची माहिती मिळताच सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी संबंधित मुकादमा कडे फोनवरून शेतगड्याकडील पैशासंदर्भात विचारले असता मुकादमाने शेतगडी विश्वनाथ पंडित यांच्याकडे दीड लाख रुपये आहेत. दीड लाख रुपये द्या आणि शेतगड्याला घेऊन जा असे सांगितले. त्यामुळे राजाराम सिरसट यांनी दीड लाख रुपये दिल्यास तुम्ही माझ्या शेतगड्याला सोडणार का? असे विचारताच त्यांनी पैसे घेऊन या त्याला सोडतो असे सांगितले. त्यानंतर राजाराम सिरसट यांनी घरी जाऊन दीड लाख रुपये घेतले व मुकादमाने सांगितलेल्या ठिकाणी गेले. यावेळी शेत गड्याने दीड लाख रुपयेदेऊ नका असे सांगितले. त्यामुळे मुकादम शेख राजू शेख बाबू आणि त्याच्या साथीदारानी शेत गड्यासह शेत मालक सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांना शिवीगाळ करून मारहाण करण्यास सुरुवात केली. दरम्यान लाठ्या-काठ्या, कु-हाड आणि गुप्ती अशी धारदार शस्त्रे घेऊन झाडीमध्ये लपून बसलेल्या दहा-बारा जणांनी बाहेर येत शेतगडी आणि शेतमालक राजाराम सिरसट यांना मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी मुकादमाने त्याच्या जवळ असलेल्या रिव्हॉल्वरचा धाक दाखवून पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली असता पोलीस खात्यातील कैशल्याचा वापर करून राजाराम सिरसट यांनी शिताफिने मुकादमा जवळील रिव्हॉल्वरचा ताबा घेतला. परंतु सदर रिव्हॉल्वर मध्ये बुलेट नाहीत हे मुकादम आणि त्याच्या साथीदारांना माहित असल्याम ुळे आपल्याला काही धोका नाही हे सर्वांना ज्ञात होते. त्यामुळे सर्वांनी असुरी हसत पुन्हा जबर मारहाण करायला सुरुवात केली. या मारहाणीत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी



राजाराम सिरसट गंभीर जखमी झाले. या गंभीर जखमी अवस्थेत राजाराम सिरसट यांना जबरदस्ती मोटरसायकलवर बसवून माजलगाव तालुक्यातील ढोरगाव आणि लवूळ शिवारातील घनदाट असलेल्या जंगलात घेऊन जाऊन पुन्हा मारहाण करायला सुरुवात केली. यावेळी सदरील मुकादम आणि त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांच्या जवळील दीड लाख रुपये हिसकावून घेत बेदम मारहाण केली. या मारहाणी मध्ये राजाराम सिरसट यांच्या घशाला कोरड पडल्यामुळे त्यांनी मुकादम आणि मारहाण करणाऱ्यांकडे मला मारू नका, मी मरेन, मला पाणी द्या अशी विनंती करून पिण्यासाठी पाणी मागितले असता या गुंडांनी त्यांच्या तोंडावर लघुशंका केली. यावर हे लोक थांबले नाहीत यांनी त्यांच्या कानात नको ती कृती करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान आपल्या साहेबासोबत अमानुष कृत्य करत आहेत आणि बेदम मारहाण करत आहेत हे पाहून घाबरलेला शेतगडी त्या ठिकाणाहून पळून गेले व त्यांनी राजाराम सिरसट यांच्या मुलाला फोन करून मुकादम आणि त्याचे साथीदार जबर मारहाण करत आहेत. तुम्ही ताबडतोब या असे फोन द्वारे सांगितले.







आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याचे समजताच राजाराम सिरसट यांचा मुलगा विजयकुमार सिरसट यांनी वडीलांना फोनवरून संपर्क साधला असता मुकादम व त्याच्या साथीदारांनी राजाराम सिरसट यांना कोणाचा फोन आहे असे म्हणत फोन उचलण्यासाठी सांगितले. त्यावेळी राजाराम सिरसट यांनी आपल्या मुलाला फोनवरून मला लऊळ गावातील सैलानी बाबा परिसरात मुकादम आणि त्याचे काही साथीदार मारहाण करत आहेत ताबडतोब ये असं निरोप दिला. आपल्या वडिलांना मारहाण होत असल्याने विजयकुमार सिरसट मित्रांना घेऊन वडिलांना वाचवण्यासाठी घटनास्थळी पोहोचले. यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा आणि त्याचे मित्र येत असल्याचे पाहून मुकादम व त्याच्या गुंडांनी गंभीर जखमी झालेल्या राजाराम सिरसट यांना पुन्हा गाडीवर बसवून घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला. यावेळी रस्त्यावर
चिखल असल्याने मोटारसायकल चिखलात स्लिप झाली व मोटारसायकलवरील तिघे खाली पडले. त्यावेळी राजाराम सिरसट यांचा मुलगा व त्याचे मित्र घटनास्थळी येताच मारहाण करणारे गुंड पळून गेले. दरम्यान या वेळी मारहाण करणाऱ्या मुकादमाला विजयकुमार सिरसट यांच्या मित्रांनी पकडून माजलगाव पोलीस ठाण्यात आणले. सेवानिवृत्त पोलीस अधिकारी राजाराम सिरसट यांनी म ारहाण करणाऱ्या मुकादम आणि त्याच्या साथीदाराच्या विरोधात तक्रार दिली असून आज शनिवार दिनांक १२ रोजी सायंकाळी उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. या मारहाणीत राजाराम सिरसट हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील जिल्हा रुग्णालय उपचार सुरू आहेत.किरकोळ पैशासाठी

मुकादम आणि त्याच्या साथीदारांकडून सेवानिवृत्त पोलीस अधिकाऱ्यांना अमानुष आणि गंभीर मारहाण होते हे बाब अतिशय गंभीर आणि अमानवी आहे. या घटनेने जिल्ह्यात एकच खळबळ उडाली.

# सरकारी वकील अशोक पोटे यांना भावनीक निरोप




प्रतिनिधी किनवट,दि.११ :किनवट न्यायालयातील सरकारी वकील अशोक पोटे यांची येथील आठ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर अकोला येथील न्यायालयात नुकतीच बदली झाली आहे.यानिमित्त त्यांना वकील संघातर्फे नुकत्याच झालेल्या एका कार्यक्रमात भावनिक निरोप देण्यात आला.अध्यक्ष स्थानी दिवाणी न्यायाधीश पी.एम. माने हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून सहदिवाणी न्यायाधीश के.एस.मेंढे हे उपस्थित होते.

यावेळी वकील संघातर्फे जेष्ठ वकील के.एस.काजी यांनी अशोक पोटे यांना पुष्पहार घालून,शाल पांघरुन व पुष्पगुच्छ देऊन भावपूर्ण सत्कार केला. यावेळी सर्व वकीलांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात ॲड.दिलिप काळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या व पुढील वाटचालीसाठी अशोक पोटे यांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड.टेकसिंग चव्हाण, सचिव ॲड.माझ बडगुजर,सहसचिव ॲड.मुसळे, कोषाध्यक्ष ॲड.सम्राट सर्पे यांनी पुढाकार घेतला. कार्यक्रमास वकील,न्यायालयीन कर्मचारी,पक्षकार यांची उपस्थिती होती.

# विधिज्ञ साहित्य संमेलनात ॲड.हशम पटेल सर यांच्या कवितेची निवड



प्रतिनिधी प्रांजली प्रविण काळबेंडे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती मा. प्रसन्ना वराळे साहेब व मा. न्यायमूर्ती अभय ओक साहेब तसेच उच्च न्यायालयामधील माननीय न्यायमूर्ती महोदय यांच्या उपस्थितीमध्ये विधीज्ञ संघाचे पहिले विधीज्ञ साहित्य संमेलन दिनांक २६ जुलै २०२५ रोजी राष्ट्रीय विधी विद्यापीठ, नक्षत्रवाडी, छत्रपती संभाजीनगर येथे होत आहे. यासाठी औसा येथील जेष्ठ विधिज्ञ तथा पाठ्यपुस्तक कवी हशम पटेल सर यांच्या शांतीगीत या कवितेची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या २०१३ मध्ये प्रकाशित “संग्राम” या काव्यसंग्रहातून या कवितेची निवड करण्यात आली असून ती आंतरभारती इयत्ता नववीच्या पाठ्यपुस्तकात अभ्यासक्रमासाठी समाविष्ट करण्यात आली आहे. त्याचबरोबर २०२१ मध्ये आणि २०२४ मध्ये “विश्वाचा आर्त गहिवर” या कविता संग्रहाचे प्रकाशन झाले आहे. वैविध्यपूर्ण लिखाण व साहित्य याची सांगड घालून निवडक साहित्यांची निवड केली आहे. साहित्य संमेलनाचे हे प्रथम वर्ष असून मोठ्या संख्येने साहित्यिक उपस्थित राहणार आहेत.

# पंकजाताई मु ंडे यांच्या वाढदिवसानिमित्त बऱ्हाणपूर येथे कापडी पिशव्या वाटप



राज्याच्या पर्यावरण मंत्री आणि लोकनेते पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण राज्यभर सेवा पंधरवडा साजरा केला जात आहे. त्याच पार्श्वभूमीवर बऱ्हाणपूर गावात प्लास्टिकमुक्त गाव या संकल्पनेवर आधारित पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला. ग्रामपंचायतीचे उपसरपंच गणेश लांडे यांच्या पुढाकाराने गावात कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाला गावाचे सरपंच गोरख शिंदे, गोरक्षनाथ महाराज लांडे, लिंबाजी लांडे, तसेच इतर जेष्ठ नागरिक आणि लहान थोर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात प्लास्टिकमुळे होणारे पर्यावरणीय दुष्परिणाम, मातीची गुणवत्ता कमी होणे, जनावरांवर होणारे दुष्परिणाम याविषयी माहिती देण्यात आली. ग्रामस्थांनी प्लास्टिकचा वापर बंद करून पर्यावरणपूरक कापडी पिशव्या वापरण्याचा निर्धार व्यक्त केला.

# डिजिटल मिडिया परिषदेचा सप्टेंबरमध्ये संभाजीनगरात राज्यव्यापी मेळावा

मुंबई : डिजिटल मिडियात कार्यरत असलेल्या पत्रकारांचा पहिला राज्यव्यापी मेळावा 14 सप्टेंबर 2025 रोजी संभाजीनगर येथे होत असल्याची माहिती मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर आणि डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांनी दिली.. मेळाव्याचे उद्घाटन राज्यातील पत्रकारांचे नेते एस.एम.देशमुख यांच्या हस्ते होणार आहे.. अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचा एक उपक्रम असलेल्या डिजिटल मिडिया परिषदेचा विस्तार राज्यभर झपाट्याने होत आहे.. राज्यातील 30 जिल्ह्यात डिजिटल मिडियाच्या शाखा सुरू झाल्या आहेत.. सर्वांना एका धाग्यात बांधण्यासाठी एक राज्यव्यापी मेळावा आयोजित करण्यात आला आहे.. या मेळाव्यात राज्य कार्यकारिणीची घोषणा होणार असून उत्कृष्ट युट्यूब चॅनल आणि पोर्टल चालविणारया दहा संपादकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.. दोन सत्रात



होणारया या मेळाव्यात व्यावसायिक पध्दतीने चॅनल कसे चालवावे, त्यातून महसूल कसा उभा करावा, या संबंधी तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे.. मेळाव्याचे स्थळ आणि अन्य माहिती लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. राज्यातील युट्यूब, पोर्टलच्या संपादकांनी मेळाव्यास मोठ्या संख्येनं उपस्थित राहावे असे आवाहनही मिलिंद अष्टीवकर आणि अनिल वाघमारे यांनी केले आहे...

# आज ज्येष्ठ नागरिकांचा महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाटनांदेड : महाराष्ट्र शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या न्याय मागण्याकडे आजूनही सहानभूतिने लक्ष दिले नसल्या मुळे शासनाने किमान या चालू पावसाळी अधिवेशनात तरी ज्येष्ठ नागरिकांच्या न्याय तथा प्रलंबित मागण्या मानधनासह मान्य करून न्याय द्यावा म्हणून आषाढीच्या पार्श्वभूमिवर उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग फेस्कॉम नांदेडच्या वतीने शासनाचे व लोक प्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी एक भव्य असा आषाढी लक्षवेधी मागणी महामोर्चा व उघडा डोळे, पहा निट ठिय्या अंदोलनाचे आयोजन आज दि.१३-जुलै रविवारी करण्यात आले आहे. हा लक्षवेधी महामोर्चाचे नेतृत्व डॉ.हंसराज वैद्य हे करणार आहेत, त्यांच्या सोबत प्रभाकर कुंटूरकर,गिरीश बार्हाळे, रामचंद्र कोटलवार, लम्क्षी पुरणशेट्टीवार, डॉ.अंजली चौधरी, डॉ.पुष्पा कोकीळ, श्रीमती खान, डॉ.क्राप्रतवार, माधवराव पवार,एम.झेड. सिद्दिकी आदिंच्या सहकार्याने अत्यंत शिस्तीत हा मोर्चा निघणार आहे.मोर्चा वजिराबाद चौकातून ठिक ११ वाजता निघेल जवळपास आठ ते दहा हजार गरिब गरजवंत ज्येष्ठ नागरिक मोर्चात सहभागी होणार आहेत.मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर विसावेल

फेस्कॉमचे मोजके कार्यकारणी सदस्य जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर करतील.


# नरेगा योजनेमधील वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकर वाटप करावेत

नेकनूर । प्रतिनिधी महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत वैयक्तिक लाभाच्या जलसिंचन विहीर, फळबाग,शेततलाव या कामाच्या कुशल बील गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे.यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, रोजगार हमी योजना कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांना युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी पत्रव्यवहार करून वैयक्तिक लाभाचे कुशल देयके लवकरात लवकर देण्यात यावे अशी विनंती केली होती.याची दखल घेउन उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व रोजगार हमी कॅबिनेट मंत्री भरत शेठ गोगावले यांनी निधी उपलब्ध करून दिला आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी पंचायत समिती बीड येथील मग्रारोहयो अंतर्गत कुशल निधी प्राप्त झाला आहे. परंतु अद्याप पर्यंत ते कुशल देयके वाटप करण्यात आले नाही. सदरील पंचायत समिती कार्यालय मधील वैयक्तिक कामाचे कुशल बील हे सरसकट सोडण्यात यावे यात कोणतेही बील मागे ठेवण्यात येऊ नये.अशी मागणी युवासेना बीड जिल्हाप्रमुख सुजित शिंदे यांनी गटविकास अधिकारी बीड यांच्याकडे केली आहे.

# माजलगांव शहरात दामिनी पथक यांचे फेरी चालु करा , माजलगांव शहरात टुकार मुलाचे दिवसे न दिवस वाढ होत आहे,

माजलगांव प्रतिनिधी ........

माजलगाव शहरात कॉलेज शाळा खुप आहे खेड्या गावातून विद्यार्थी मुली शाळेत जाताना येताना टुकार मुलाचा खुप त्रास सहन करावे लागत आहे त्यात मोटार सायकलने कट मारणे शिटी वाजवणे गाड़ी वेगात धावणे असे रोज प्रकार शाळेच्या गेट पशी किव्हा रस्त्यावर होताना दिसत आहे म्हणून एस पि साहेबानी दामिनी पथक चालू करून माजलगांव नागरिकाना दिलासा द्यावा असे बोलले जात आहेपालक आपल्या मुंलि सुरक्षित राहावे म्हणून शाळेत वारम वार सर लोकाना



सांगतात कि आमच्या मुली वर लक्ष राहू द्या परंतू भाहेर आमाला माहित नाही असे सर लोक सागुन मोकळे होतात माजलगाव शहरात कॉलेज शाळा परिसरात चिड़ीमार कळस गाठला असून, महाविद्यालयीन, शांळकरी मुलींची छेड काढण्याच्या प्रकारात वाढ झाली आहे. शाळा, महाविद्यालये तसेच खासगी शिकवणी वर्गांच्या परिसरात दिवसाढवळ्या मुलींची छेड काढल्या जात असल्याने अखेर सर्वसामान्य नागरिकांनी टवाळखोर व चिडीमारांचा बंदोबस्त करण्याची मागणी लावून धरली आहे. भविष्यातील अनुचित प्रकार टाळण्यासाठी मेन रोडवरील शाळा मुलिचे कन्या महाविद्यालय कॉलेज जवळ मागील काही दिवसांपासून म हाविद्यालय परिसरालगत चिडीमार व टवाळखोर युवकांनी अक्षरश: हैदोस घातला आहे. महाविद्यालयीन तसेच शाळकरी मुलींची दिवसा ढवळ्या छेड काढणे,प्रकार होताना दिसत आहे दामिनी पथक यांचे फेरी मारून टुकार मुलाचा बंदोबस्त एस पी साहेब व पोलीस निरीक्षक यांनी माजलगाव शहरात दामिनी पथक स्थापना करुन मुलींची छेड काढणाऱ्याचा बंदोबस्त करावा अशी मांगणी दैनिक चालु वार्ता पेपरचे पत्रकार नाजेर कुरेशी यांनी पोस्टव्दारे एस पी साहेब बिड यांना निवेदन दिले आहे

# नगरसेवक श्रीहरी गीते बापू यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग सतराचा झाला कायापालट!जनतेच्या हाकेला नेहमी धावणारा नेता विकासाचे प्रतिक श्रीहरी बापू गीते!

पाटोदा (प्रतिनिधी) नेता तोच जो गरजवंतांच्या घरी पहाटे पोहोचतो, आणि काम तेच जो जनतेच्या आशीर्वादाने बोलतो! हे वाक्य आज पाटोदा नगरपंचायतच्या प्रभाग क्रमांक सतरा मध्ये अक्षरशः सत्य ठरत आहे. कारण या प्रभागाचे नगरसेवक श्रीहरी गीते बापू यांनी आपल्या अथक मेहनतीने संपूर्ण परिसराचा चेहरा मोहराच बदलून टाकला आहे.

कधीहीजात,धर्म,पक्ष,श्रीमंत-गरीब असा कुठलाही भेद न ठेवता, प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात आपल्या कुटुंबाच्या



आधी धावणारा नेता म्हणजे श्रीहरी बापू गीते! ते केवळ एक नगरसेवक नाहीत, तर प्रत्येक प्रभागवासीसाठी आश्वासक आधारवड ठरले आहेत. ज्यांना वर्षानुवर्षे घरकुलाचे स्वप्न होतं, अशा अनेक गरजू कुटुंबांना श्रीहरी बापूंच्या प्रयत्नातून आज स्वतःचं हक्काचं घर मिळालं.बापू येतात आणि काम होतं! हा विश्वास आज प्रत्येकाच्या मनात खोलवर बसलेला आहे. रस्त्यांचं जाळं, प्रभागाची नवसंजीवनी कधी चिखलात अडकलेले, पावसात बुडालेले रस्तेः आज तिथे मजबूत कॉंक्रीटचे रस्ते उभे आहेत. ज्याठिकाणी चालणे अवघड होतं, तिथे आता स्वच्छ, सुंदर आणि सुरक्षित रस्ते आहेत हा बापूंच्या कामाचा ठसा आहे. नेहमी जनतेमध्ये, सदा सेवा भावात कोणतंही कार्य असो, आजारी व्यक्तीला मदत करायची असो, कोणाची अडचण असो बापू हे नाव ऐकताच मदतीचा हात पुढे येतो.म्हणून प्रभाग सतरा आज अभिमानाने म्हणतो श्रीहरी बापू गीते आहेत म्हणून आम्हाला भीती नाहीः!विकासाचा चेहरा बदलणारे, विश्वासाचं नाव म्हणजे नगरसेवक श्रीहरी बापू गिते.

# अजित पवार पहाटेच उतरले रस्त्यावर, पुण्यातील आयटी पार्कमध्ये जाऊन दिले असे आदेश

शिक्षणाची राजधानी म्हणून ओळख असलेल्या पुणे शहर आयटी सिटी म्हणून ओळखले जाऊ लागले. आयटी सिटीमधील हिंजवडी भागात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. दहा मिनिटांचा पावसात हा भाग वॉटर पार्क होत आहे. त्यासंदर्भात गेल्या अनेक दिवसांपासून चर्चा सुरु आहे. त्यामुळे रविवारी पहाटेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार रस्त्यावर उतरले. ते थेट हिंजवडीत पोहचले. त्या भागातील समस्या जाणून घेतल्या. तसेच उपाययोजना करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना दिले. अतिक्रमण काढण्याचे आदेश रविवारी पहाटे सहा वाजेपासून राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आयटी पार्क हिंजवडीत विविध समस्या सोडवण्यासाठी रस्त्यावर उतरले. या भागात साचणारे पावसाचे पाणी, रस्त्याची समस्या, वाहतूक कोंडी यावर उपाययोजना करण्यासाठी अजित पवारच



हिंजवडीत आले. यावेळी रस्त्यावर असलेले अतिक्रमण त्यांनी पाहिले. त्यानंतर सरकारी रस्ता अडवणाऱ्या व्यक्तींवर सरकारी कामात अडथळा आणल्या प्रकरणी 353 कलमानुसार गुन्हे दाखल करा, असे स्पष्ट आदेश पीएमआरडी आणि संबंधित प्रशासनाला अजित पवार यांनी दिले. रस्त्याला विरोध करणाऱ्या स्थानिकांना मोबदला देऊ, असे अजित पवार यांनी सांगितले.

नाला बुजवत इमारती? हिंजवडीमध्ये थोडासा पाऊस पडला तरी वॉटर पार्कसारखी परिस्थिती होते. त्या भागाची पाहणी अजित पवार यांनी केली. त्यावेळी त्या ठिकाणी मोठा नाला होतो. तो बुजवत बहुमजली इमारती, कंपन्या बांधल्या गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. दोन मोठे प्रकल्प आणि एक कंपनी यांनी मिळून एक मोठा नाला बुजवल्याचे नागरिकांनी त्यांना सांगितले. त्यामुळे हिंजवडीच्या फेज श्रीमध्ये थोडा पाऊस पडला तरी मोठ्या प्रमाणात रस्त्यावर पाणी साठत असल्याचे लक्षात आले. त्यावर अजित पवार यावर काय कारवाई करतात? हेच पाहणे महत्त्वाचे राहणार आहे. मेट्रो प्रशासनला दिल्या सूचना

उपमुख्यमंत्री अजित पवार मेट्रो लाईन तीन हिंजवडीची पाहणी केली. प्रस्तावित मेट्रोच्या जिन्याला पर्यायी जिना तयार करा आणि तो रस्त्याच्या बाजूला घ्या, एक आठवड्याच्या आत या ठिकाणी बदल हवा, अशा सूचना मेट्रो प्रशासनावर दिल्या. यावेळी आयटीईन्सकडून अजित पवार यांना समस्या सांगण्यात आल्या. तसेच ज्या रस्त्यावरून पावसामुळे साचलेल्या पाण्यातून पीएमपीएमएलची बस गेली होती, त्या रस्त्यावर अजित पवार रस्त्यावरून चालत गेले. त्यांनी त्या भागाची पाहणी केली.

# मानव विरुद्ध वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी AI तंत्रज्ञानाची मदत, जंगलांमध्ये ९०० कॅमेरे लावले जाणार

राज्यात मानव विरुद्ध वन्यजीव हा संघर्ष टोकाला गेला आहे. वाघांची संख्या वाढल्याने जंगली भागात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. यावर उपाय म्हणून राज्यातील व्याघ्र प्रकल्पात AI बेस तंत्रज्ञयुक्त 900 कॅमेरे व्याघ्र प्रकल्पात लावले जाणार आहेत. यासाठी मार्वल कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांच्या उपस्थितीत हा करार झाला. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

**जंगलात 900 कॅमेरे लावणार – बावनकुळे**

याबाबत बोलताना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले की, आपण जगातील आधुनिक घेत आहोत. आता 900 ठिकाणी कॅमेरे लावले जाणार आहेत. तसेच 900 ठिकाणी अलार्म असतील, ताडोबापासून ते नवेगाव बांध पर्यंत सर्वच फॉरेस्ट एरियात हे कॅमेरे असणार आहेत. जेव्हा एखादा वाघ किंवा बिबट्या गावाकडे किंवा खाजगी जाता दिसेल तेव्हा हे कॅमेरे त्यांना डिटेक्ट करतील आणि तात्काळ गावातील अलार्म वाजेल.




**या तंत्रज्ञानामुळे लोकांचा जीव वाचणार – बावनकुळे**

पुढे बोलताना बावनकुळे म्हणाले की, 'गेल्या काही वर्षांमध्ये वाघांचं प्रमाण वाढलं आहे. त्यामुळे गावाकडे वाघ येत आहेत. गेल्या काही काळात वाघाने अचानक हल्ला केल्याने काही लोकांचा जीव गेलेला आहे. ही टेक्नॉलॉजी लोकांचा जीव वाचवण्याकरिता आहे. हे तंत्रज्ञान जंगलात वापरले गेले तर मोठ्या प्रमाणात जीवहानी कमी होईल.'

**शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणार**

चंद्रशेखर बावनकुळे यांनी पुढे बोलताना सांगितले की, 'जंगलाला लागून असलेली शेतकऱ्यांची जमीन वन्य प्राण्यांमुळे पडीक पडलेली आहे. अशा शेतकऱ्यांना सरकार दरवर्षी 50 हजार रुपये एकरी तीस वर्षांसाठी भाडे देणार आहे. या जमिनीवर वनविभाग सोलार प्रकल्प, बांबू लागवडीचे प्रकल्प, ग्रासलँड डेव्हलप करणार आहे.'

**आशिष जैस्वाल काय म्हणाले?**

याबाबत बोलताना राज्यमंत्री आशिष जैस्वाल म्हणाले की, 'या तंत्रज्ञानमुळे जंगल परिसरात वाघ किंवा बिबट्यांचा आवाज आला तर वन विभागाला अलर्ट पाठवा जाणार आहे, यामुळे गावकऱ्यांना सावध करता येणार आहे. यामुळे जीवितहानी कमी होईल.' पुढे बोलताना जैस्वाल यांनी म्हटले की, 'वन्य प्राण्यांमुळे पडीक असलेली जंगल परिसरातील जमिन वन विभाग भाड्याने घेणार आहे, यासाठी शेतकऱ्यांना चांगले पैसे दिले जाणार आहेत.'

# गोपीनाथ मुंडेंच्या तिसऱ्या लेकीची राजकारणात एन्ट्री

बीड, दि. १० जुलै २०२५: रोजी महाराष्ट्र सरकारने गुरुवारी विधानसभेत मजन सुरक्षा कायदाफ सर्वानुमते मंजूर केला. हा कायदा नक्षलवादी आणि देशविघातक शक्तींविरोधात कठोर कारवाई करण्याच्या उद्देशाने आणला असल्याचे सरकारचे म्हणणे आहे. मात्र, या कायद्यामुळे अभिव्यक्ती स्वातंत्र्यासारख्या मूलभूत अधिकारावर गदा येईल, असा गंभीर आरोप ऑल इंडिया पँथर सेनेचे महाराष्ट्र प्रवक्ते नितीन सोनवणे यांनी केला आहे.

परळी । प्रतिनिधी भाजपचे दिवंगत नेते गोपीनाथ मुंडे यांच्या तिसऱ्या कन्या यशस्वी मुंडे या राजकीय मैदानात उतरल्या आहेत. बीडमधील परळी येथील वैद्यनाथ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक निवडणुकीच्या यशस्वी मु ंडे यांनी संचालक पदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यशस्वी यांच्यासोबत माजी खासदार प्रीतम मु ंडे यांनी देखील आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागले असून, यशश्री यांच्या उमेदवारीमुळे मुंडे घराण्याचा प्रभाव आणखी वाढण्याची चर्चा आहे. पंकजा मु ंडे, प्रीतम मु ंडे यांच्यानंतर आता यशस्वी मुंडे या देखील राजकारणात उतरल्या आहेत. निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या यशश्रींसह माजी खासदार डॉ. प्रीतम मुंडे आणि एकूण ७१ उमेदवारांनी अर्ज



दाखल केले आहेत. ही निवडणूक १७ जागांसाठी होत आहे. १० ऑगस्टला मतदान आणि १२ ऑगस्टला मतमोजणी होणार आहे. उमेदवारी अर्जांची छाननी १४ जुलैला होईल, तर १५ ते १९ जुलै दरम्यान अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. यशश्री मु ंड े यांनी अमेरिकेतील प्रतिष्ठित कॉर्नेल विद्यापीठातून शिक्षण पूर्ण केले आहे. कॉर्नेल विद्यापीठात जगभरातील फक्त ११ टक्के विद्यार्थ्यांनाच प्रवेश मिळतो. यशश्री यांना मप्रॉमिसिंग आशियाई स्टुडंटफम्हणून गौरवण्यात आले होते. त्यांचे शिक्षण इंग्रजी माध्यमातून झालेय. यापूर्वी त्या राजकारणापासून दूर राहिल्या होत्या. मात्र, आता वैद्यनाथ बँकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने त्या राजकीय मैदानात उतरल्या आहेत.

# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये गुरू-शिष्य नात्याचे स्मरण



**बीड : गुरूंच्या सन्मानाचा आणि त्यागाच्या स्मरणाचा पवित्र दिवस असलेली गुरुपौर्णिमा गुरुवार, दि. १० जुलै रोजी तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून गुरूंच्या महानत्वाचे अत्यंत सुंदर आणि प्रभावी चित्र साकारले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून गुरू म्हणजे ज्ञानाचे दीप हा संदेश हृदयस्पर्शी पद्धतीने साकारण्यात आला. या प्रसंगी प्राचार्या सौ.उमा जगतकर यांनी आपल्या भाषणातून गुरू-शिष्य परंपरेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी विद्यार्थ्यांना गुरूजनांविषयी नेहमी सन्मान, कृतज्ञता आणि आदर बाळगण्याचे आवाहन केले. गुरूंच्या शिकवणुकीचा आदर करणे, ती प्रत्यक्ष आयुष्यात आचरणात आणणे हेच खरे गुरुदक्षिणेचे स्वरूप असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या सांस्कृतिक समितीने केले असून, शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यामुळे तो यशस्वी व प्रेरणादायी ठरला.**



राज्यातील दिव्यांग बांधवांच्या न्याय्य हक्कांसाठी रिपब्लिकन पक्ष ऑफ इंडिया (आठवले गट) दिव्यांग आघाडीने आक्रमक पवित्रा घेतला आहे. प्रदेशाध्यक्ष सुरेश धर्मराज माने यांनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री व आरपीआयचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन सरकारकडे दिव्यांगांच्या प्रमुख ८ मागण्यांचे निवेदन दिले

# ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी, लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष!

बीड प्रतिनिधी – ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष देत असल्याचे मत रमेशराव गंगाधरे आणि एस.एम.युसू फ़ यांनी व्यक्त करत प्रसिद्धी माध्यमांचे आभार मानले आहे. याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, ऐतिहासिक कारंजा टॉवर च्या परिपूर्ण नूतनीकरणासाठी सन २०१४ सालापासून लढा सुरू आहे. गेल्या ११ वर्षात याविषयी जिल्हाधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार एवढेच नव्हे तर जिल्हा पोलीस अधीक्षकांना सुद्धा वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. या लढ्यास लोकशाहीचे चौथे आधारस्तंभ असलेल्या पत्रकारिता क्षेत्रातूनही वेळोवेळी वाचा फोडण्यात आलेली आहे. या लढ्यास बीड जिल्ह्यासह इतर जिल्ह्यातील वृत्तपत्रांकडूनही तेवढ्याच तोलामोलाचे सहकार्य मिळत आहे. यामुळे कारंजा टॉवर चा विषय आता फक्त बीड शहर किंवा जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता मराठवाड्यासह महाराष्ट्रात सुद्धा पोहोचला आहे. कारंजा टॉवरसाठी नागरिक पुढे येऊन स्वखर्चाने एक-एक कामे मार्गी लावत आहेत. गेल्या काही महिन्यात लोकसहभागातून कारंजा टॉवरसाठी ५ कामे झाली आहेत. तरीही उर्वरित १२ कामे अजून बाकी आहेत. याकरिता उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना सातत्याने निवेदन रुपात आठवण करून देण्याचे कार्य नित्यनेमाने केले जात आहे. शिवाय शासन-प्रशासन जागरूक व्हावे, याकरिता प्रसिद्धी माध्यमातून सातत्याने बातम्या व लेख प्रकाशित करण्यासाठी दिले जात आहे. मात्र शासन-प्रशासनाकडून अजूनही या ऐतिहासिक वास्तूकरिता ठोस कार्य करण्यासाठी पाऊल उचलले जात नाहीये. यामुळे लढा अजून संपलेला नाही तर सुरूच आहे. जोपर्यंत परिपूर्ण नूतनीकरण होणार नाही, तोपर्यंत ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी लढा सुरूच राहणार आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी प्रशासनिक अधिकारी व लोकप्रतिनिधींच्या कार्याकडे लक्ष ठेवणार असल्याचे मत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसू फ़ यांनी व्यक्त केले आह

# अधिवेशनातून राज्याला विकासात्मक दृष्टीने पुढे घेऊन जाणारे मुद्दे हद्दपार झाले

बीड प्रतिनिधी : मुंबई येथे पावसाळी विधीमंडळ अधिवेशनाचे कामकाज सुरू आहे हे अधिवेशन सुरू झाल्या पासून ते आजपर्यंत एकाही आमदाराने व मंत्र्यांने खालील मुद्यावर आवाज उचलेला ऐकण्यात आले नाही ज्या मुद्द्यांचा आणि राज्याच्या विकासाचा काही एक संबंध नाही अशा मुद्द्यांना दररोज सभागृहात पुढे करून एकमेकांची उणेदुणे काढणे सुरू आहे गल्लीत नळाच्या पाण्यासाठी ज्या पद्धतीने वाद होतात त्याच पद्धतीने सभागृहात आमदार मंत्री एकमेकांशी वाद घालताना दिसत आहेत अधिवेशन सुरू झाल्या पासून नुसती एकमेकांविरुद्ध चिखलफेक सुरू आहे पवित्र अशा सभागृहात एकमेकांशी खालच्या स्तरावर जाऊन आमदार मंत्री बोलत आहेत नको ते मुद्दे उकरून काढत आहेत व सभागृहाचे कामकाज बंद करीत आहेत तिकडे जग चंद्रावर चालले आहे नुकतेच नासानं नऊ महिन्यापासून अंतराळात अडकलेल्या सुनिता विल्सम्स यांना परत पृथ्वीवर आणंल आहे आणि आपले आमदार मंत्री हे जाती धर्माचे आणि महापुरुषांचे मुद्दे पुढ े करून एकमेकांसोबत भांडत बसले आहेत जनतेने तुम्हाला त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी विधानसभेत पाठवले आहे याचा विसर आमदारांना पडलेला असावा पावसाळी विधीमंडळ अधिवेनाचे कामकाज सुरू झाल्यापासून ते आजपर्यंत एकाही आमदाराने व मंत्र्यांने शिक्षणाचे खाजगीकरण, सार्वजनिक आरोग्य सेवा, शेतकरी आत्महत्या, शेतकऱ्यांच्या पिकाला हमीभाव, शेतकरी कर्जमाफी शेतकऱ्यांची खाजगी सावकाराकडून होत असलेली आर्थिक पिळवणूक तसेच राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे प्रश्न राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या हाताला काम मिळेल अशी तरतूद कोणी केली नाही, राज्यामध्ये आज मोठ्या प्रमाणावर महिला व महाविद्यालयीन मुलीवर अन्याय अत्याचार वाढले आहेत सभागृहात असणाऱ्या महिला आमदार मंत्र्यांनी महिला असून देखील महिलांच्या बाजूने सभागृहात आवाज उचलला नाही, राज्यातील तरुणांच्या हाताला काम नसल्यामुळे तरुण मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी क्षेत्राकडे वळत आहे, देशासह राज्यात महागाईने उच्छांक गाठला आहे जीवनावश्यक वस्तूंचे दर गगनाला भिडले आहेत महागाईच्या विरोधात पण सभागृहात चर्चा होत नाही, राज्यातील शासकीय व निमशासकीय कार्यालय भ्रष्टाचाराने पोखरले गेले आहेत त्या बद्दल कोणी ब्र शब्द काढत नाही, आरोग्यात भ्रष्टाचार, शिक्षणात भ्रष्टाचार इतकेच काय सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या खाण्यापिण्यात व त्यांना मिळणाऱ्या सुख सुविधांमध्ये देखील भ्रष्टाचार होत आहे. या सर्व प्रश्नावर अपवाद वगळता एखादा आमदार व मंत्री बोलला असेल पण ठोस उपाययोजना नाही पावसाळी विधीमंडळ बीड: सौ.के.एस.के. (काकू) अन्नतंत्रज्ञान (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी.एस.सी. ऑनर्स. ॲग्री) महाविद्यालय, म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड, येथे ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये चुरस निर्माण झाली असून यामधे विद्यार्थीनी (मुलींचा) प्रचंड उत्साह असून उत्स्फूर्तपणे पालकांसह मुली या महाविद्यालयात माहिती घेवून प्रवेशासाठी येत आहेत. १२वी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अन्नतंत्र आणि कृषि शिक्षणाची प्रवेश प्रक्रिया दि.४ जुलै २०२५ पासून सुरू असून अंतिम दि. १७ जुलै २०२५ आहे. तरी सर्व बारावी सायन्स उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी अन्नतंत्र (बी.टेक. फूड टेक्नॉलॉजी) आणि कृषि (बी. एस्सी. ऑनर्स. ॲग्री) पदवी शिक्षणासाठी प्रवेश घेण्यास विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी संलग्न असलेल्या ङ्गङ्घअङ्घङ्घ दर्जा प्राप्त सौ.के.एस. के. (काकू) अन्नतंत्र व कृषि महाविद्यालय म्हसोबा फाटा, नगर रोड, बीड येथे ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरुन प्रवेशासाठी त्वरित यावे. या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी प्रवेशासाठी ज्या विद्यार्थ्यांनी सीईटी (-) परिक्षा तसेच अभ्यासक्रमाशी संबंधित राष्ट्रीय प्रवेश परिक्षा जे.ई.ई. आणि एन.ई.ई.टी. ( ) दिलेल्या आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांनी या महाविद्यालयास त्वरित संपर्क करून आपला प्रवेश निश्चित करावा. या महाविद्यालयाचे प्रवेश प्रक्रियेसाठी विद्यार्थी व पालकांनी सागर हाईट्स, बस स्टॅन्ड समोर, बीड येथे यावे, या ठिकाणी ऑनलाईन प्रवेश फॉर्म भरण्याच्या सर्व सुविधा विनामुल्य (मोफत) उपलब्ध आहेत. या दोन्ही महाविद्यालयांना कृषि विद्यापीठाचा अ दर्जा असल्याने तसेच महाराष्ट्रासह भारतात आणि विदेशातही या गुणवत्तापूर्ण शिक्षण देणाऱ्या अ दर्जा प्राप्त महाविद्यालयांचा नावलौकिक झाला असून, पदवी प्राप्त सर्व विद्यार्थी महाविद्यालय स्थापनेपासून शंभर टक्के नोकरीस तसेच चांगल्या आस्थापनेमधे उद्योग व्यवसायामधे स्वयंपूर्ण असल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याने सर्व भागातील पालकांमधे या महाविद्यालया बद्दल आपुलकीची भावना निर्माण झाली आहे. यामुळे अत्यंत प्रचंड अशा उपस्थितीत विद्यार्थी प्रवेशास येत आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com